# प्रकरण दुसरे

# प्रकरण दुसरे
# मराठी कथेची परंपरा

## प्रस्तावना

१९ व्या शतकापासून मराठी वाङ्मयाच्या क्षेत्रात अनेक बदल झालेले आहेत. प्रामुख्याने ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, आदिवासी साहित्य, स्त्रीवादी साहित्य, जनवादी साहित्य अशा साहित्य प्रवाहात झालेले बदल व या साहित्य प्रवाहांनी आपआपल्या जाणिवा प्रवाहात आणून अनेक आमुलाग्र बदल घडवून आणले. कथा, कादंबरी, काव्य, नाटक, चरित्रे व आत्मचरित्रे अशा वाङ्मयप्रकारांनी मराठी साहित्याचे दालन समृद्ध केले आहे.

## मराठी कथेची परंपरा

अनादी काळापासून कथा हा वाङ्मयप्रकार कोणत्या ना कोणत्या स्वरूपात अस्तित्वात आलेला दिसतो. हा पाया कथात्मक स्वरूपाचा आहे. जगातील प्रत्येक भाषेमध्ये कथा हा वाङ्मय प्रकार रूढ झालेला दिसून येतो.

प्राचीन काव्यसुद्धा कथेच्या रूपाचे होते. मानवी विकासाबरोबर कथावाङ्मयही विकसित होऊ लागले. जीवनातील अनेक घटना, प्रसंगातून काळानुरूप कथावाङ्मय बदलत जाऊन ते समृद्ध झाले आहे.

अलिखित (मौखिक) गोष्टी ग्रंथाद्वारे प्रकट होऊन वाचकांचे रंजन करू लागल्या. त्या एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होत असताना तिचा विकास होत गेला. यादवकालीन साहित्यात व महानुभाव साहित्यात पद्यापेक्षा गद्याला महत्त्व येऊन कथा निर्माण झाल्या. लोककथा, नीतिकथा लिहिल्या जाऊ लागल्या. महानुभाव पंथात

चक्रधरांनी आपल्या अनुयायांना उपदेश करताना केलेल्या गोष्टींचा 'दृष्टांतपाठ' ग्रंथ केशिराजबासांनी प्रसिद्ध केला. या गोष्टीरूपी दृष्टांतातून काही कथांचा जन्म झाला.

पुढे माणसांच्या मानसिक व सांस्कृतिक विकासाबरोबर मानवाची जीवनधारा बदलत गेली. मानवी जीवनातील विकासातील विविध बदलांचे प्रतिबिंब साहित्यात उमटत गेले. मानवी विकासाबरोबर पर्यायाने कथावाङ्‌मयात बदल होत गेले. वेळोवेळी सामाजिक बदलातून कथाविषय बदलत जाऊन कालपरत्वे अखिल जगातील कथाविश्व समृद्ध होत गेले.

कथा हजारो वर्षे वाचकांचे उद्‌बोधन करत करत तिचा विकास होत गेला. कथावाङ्‌मयाचा अभ्यास करताना काही साहित्यिकांनी केलेल्या व्याख्यांचा परामर्श घेणे उचित ठरेल.

१. ''कमीत कमी पात्र आणि कमीत कमी प्रसंग वापरून थोड्यावेळात परिणामकारक रितीने सांगितलेली व ऐकणाऱ्याच्या मनावर एकच एक ठसा उमटविणारी हकिकत म्हणजे कथा.''[१] – ना. सी. फडके

२. ''टाळ, मृदंग, वीणा इत्यादींच्या साहाय्याने देवादिकांच्या गोष्टी परमार्थ समुदायात सांगणे म्हणजे कथा होय.''[२] – प्र. न. जोशी

३. ''घटनात्मक इक हरे चित्रण का नाम कहानी है और साहित्य के सभी अंगो के समान रस इसका गुण है।''[३] – चंद्रगुप्त विद्यालंकार

४. "Any piece of small fiction which can be read in twenty minutes would be a short story." [4]- Wells

५. ''कहानी (कल्प) एक रचना है जिसमें जीवन के लिए एक अंग या किसी मनोभाव को प्रदर्शित करना ही लेखक का उद्देश रहता है। ..... उपन्यास के भांती उसमें मानव जीवन का संपूर्ण तथा बहद् रूप दिखाने का प्रयास

नही किया जाता। उद्यान नही जिस भांती के फुल बेलबुटे सजे हुये है बल्की एक ऐसा गमला है जिसमें एकही पौधे का माधुर्य अपने सुमन्नत रूपमें दृष्टीगोचर होता है।''[५] – प्रेमचंद्र

अशा प्रकारे कथेच्या व्याख्या वेगवेगळ्या भाषेत वेगवेगळ्या साहित्यिकांनी आपआपल्या विचारधारेनुसार केलेल्या आहेत.

मराठी कथेच्या परंपरेचे कालखंड अभ्यासकांनी स्थूलमानाने खालीलप्रमाणे मानले आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | अव्वल इंग्रजी कालखंड | : इ. स. १८०० ते इ. स. १८८५ |
| २. | करमणूक कालखंड | : इ. स. १८८६ ते इ. स. १९१५ |
| ३. | मनोरंजन कालखंड | : इ. स. १९१६ ते इ. स. १९२५ |
| ४. | यशवंत – किर्लोस्कर कालखंड | : इ. स. १९२६ ते इ. स. १९४५ |
| ५. | सत्यकथा – अभिरूची कालखंड | : इ. स. १९४६ ते इ. स. १९६० |
| ६. | नवकथेनंतरची कथा | : इ. स. १९६० ते नंतर |

मराठी कथा वाङ्मयाच्या इतिहासात मराठी मासिकांनी वाङ्मय समृद्ध केले. इंग्रज राजवटीबरोबर मुद्रणकला विकसित झाली. मुद्रणकलेच्या आगमनाने मराठीतील विविध साप्ताहिके, पाक्षिके, मासिके छापली जाऊ लागली. या नियतकालिकांच्या कामगिरीतून कथावाङ्मय बहरू लागले. लेखक आणि वाचकांचा दुवा ठरलेल्या मासिकांची कामगिरी लक्षात घेणे गरजेचे आहे. त्यातूनच हे कालखंड पाडलेले दिसून येतात.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

## अव्वल इंग्रजी कालखंड

इ. स. १८०० ते इ. स. १८८५ या कालखंडाला 'अव्वल इंग्रजी कालखंड' म्हणतात. या कालखंडात भाषांतरित गोष्टींच्या अनुकरणातून कथावाङ्मय बाळसे धरत होते. इंग्रज राजवटीबरोबर मुद्रणकला विकास पावली. इंग्रजी, संस्कृत, अरबी, पारशी आणि हिंदी भाषांचे रूपांतर मराठीत होऊन कथा वाचकांपर्यंत पोहचू लागल्या. १८०६ मध्ये अर्वाचीन मराठी कथावाङ्मयाची सुरूवात झाल्याचे दिसते. या कालखंडामध्ये तामिळनाडूतील तंजावर येथील शिवाजीराजांचे वंशज सरफोजीराजे भोसले यांनी त्यांच्या दरबारातील 'सक्सन पंडिता'कडून इसापनितीचे भाषांतर करून ते 'बालबोधमुक्तावली' या पुस्तकरूपाने छापले. हा मराठीतील मुद्रित झालेला पहिला कथासंग्रह होय. त्यानंतर विल्यम केरी यांनी 'पंचतंत्र' , 'हितोपदेश' (१८१६) ही पुस्तके मोडीलिपीत छापली. बापू छत्रे यांनी 'नीतीदर्पण' हे पुस्तक छापले. 'नारायणबोध' हे रामजी गणोजी यांचे पुस्तक तर विष्णूशास्त्री चिपळूणकरांनी अरबी भाषेतील 'सुरसकथा', 'हतीमताई' ही पुस्तके प्रसिद्ध केली. त्र्यं. ना. मंचकर यांनी 'चमत्कारिक न्यायाच्या' व 'अकलेच्या गोष्टी' तर वि. स. नवलकरांनी 'गुलबकावलीतील कथा' प्रसिद्ध केल्या. चिंतामणी दीक्षित यांनी 'विदग्धशास्त्रीचरित्र', गोविंद मोरोबा किर्लोस्कर यांनी 'चातुर्यकथा' ही पुस्तके प्रसिद्ध केलेली दिसतात.

या कालखंडातील कथावाङ्मय मुलांसाठीच्या मनोवृत्तीवर बोध देण्याच्या उद्देशाने लिहिले असून मध्यमवर्गीय कुटुंबातील समस्या व शृंगार या कथांतून दिसून येते. त्यामुळे कथावाङ्मयाच्या आगमनासाठी आवश्यक वातावरण ह्या कथांनी निर्माण केले. कथा रसाळ, बालबोध वळणाच्या व रंजनात्मक दृष्टीने लिहिल्यामुळे या कालखंडात वाचकांचा उदंड प्रतिसाद लाभला.

## करमणूक कालखंड

इ. स. १८८६ ते १९१५ या कालखंडास 'करमणूक कालखंड' म्हटले आहे. १८९० ला 'करमणूक' नावाचे मासिक हरिभाऊ आपटे यांनी सुरू केले. हीच साधारणपणे मराठी कथाङ्मयाची सुरूवात मानली जाते.

१९ व्या शतकात मराठी कथा समृद्ध झाली. त्यातील महत्त्वाचे लेखक म्हणजे हरिभाऊ आपटे यांनी 'डिस्पेशिया', 'काळ तर मोठा कठीण आला, 'पहिले भांडण' इत्यादी कथांतून आधुनिक विचारश्रेणीला महत्त्व देत सांसारिक जीवनातील अनुभवाचे चित्रण त्यांनी कथेत केले आहे. 'काळ तर मोठा कठीण आला' या दुष्काळावर आधारित सत्य घटनांवर आधारित ग्रामीण जीवनाचे व मानवी हालअपेष्टांचे दर्शन त्यांच्या कथा घडवू लागल्या. त्यामुळेच ग्रामीण कथासंग्रहांचा मान 'काळ तर मोठा कठीण आला' या कथासंग्रहास जातो.

हरिभाऊनी आपल्या 'करमणूकी'तून प्रौढ वाचकांसाठी 'आजकालची गोष्ट' या सदरातून कादंबरी लेखन केले तर किशोरवयातील वाचकवर्गासाठी 'स्फूटगोष्टी' सुरू केल्या. म्हणूनच मराठी कथेचे आद्यप्रवर्तक म्हणून हरिभाऊंचा उल्लेख करावा लागतो.

हरिभाऊंच्या कथेतील आशय सरळसाधा व सर्वसामान्याना समजेल अशा भाषेतून होता. त्यामुळे सर्व वाचकवर्ग त्यांच्या कथेकडे आकर्षित होऊ लागला. हरिभाऊंनी विधवा विवाह, बालविवाह, केशवपन या तत्कालिन सामाजिक प्रश्नांचा परामर्श आपल्या कथा लेखनातून घेतला. 'पाडव्याला भेट', 'थोड्या चुकीचा घोर परिणाम', 'अपकाराची फेड उपकाराने', 'खरी की खोटी', 'कसे दिवस गेले' इत्यादी कथासंग्रहातून अनेक आशय-विषय वाचकांपर्यंत पोहचविले. काही ऐतिहासिक कथांचे लेखन त्यांनी केले. रूपककथाही त्यांनी लिहून छोट्या छोट्या संदर्भातून बोधपर कथालेखन केले आहे.

"हरिभाऊंच्या वाङ्मयीन मोठेपणामुळे वा जेष्ठत्वामुळे म्हणा, करमणुकीला अग्रेसरत्व प्राप्त झाले."[६] असे इंदुमती शेवडे म्हणतात हे योग्य वाटते.

## मनोरंजन कालखंड

करमणूकीनंतर कथेला नव्या वळणावर नेण्याचे काम 'मनोरंजन' या का. र. मित्रांच्या मासिकाने केले. 'करमणूक' मासिकानंतर म्हणजे १८८५ मध्ये या 'मनोरंजन' मासिकाने जरी सुरूवात केली असली तरी १९०९ नंतर नव्या दमाने 'मनोरंजन' मासिकाने सुरूवात केल्याचे दिसते. या काळात वि. सी. गुर्जर, ना. ह. आपटे व वा. ना. देशपांडे हे महत्त्वाचे कथाकार नव्या जोमाने कथा लिहू लागले. या नामवंत लेखकांबरोबर स्त्री लेखिकांही या कालखंडात कथालेखन करू लागल्या. हा पहिला विशेष 'मनोरंजन' कालखंडात घडला. या काळात स्त्री शिक्षणाला होणारा विरोध निवळत चालला होता. त्यामुळे स्त्रिया शिकू लागल्या. हरिभाऊंच्या 'करमणूकी'तील स्त्री व 'मनोंरजन' कालखंडातील स्त्री यामध्ये हा मूलभूत भेद दिसून येतो. तो म्हणजे स्त्रीला झालेली स्वत्त्वाची जाणीव. म्हणून 'करमणूक' कालखंडात बीजारोपण झालेली कथा 'मनोरंजन' काळात जोमाने वाढू लागली.

आनंदीबाई शिर्के, गिरिजाबाई केळकर या लेखिका आपआपल्या समस्या कथेतून मांडू लागल्या. वि. सी. गुर्जर, ना. ह. आपटे व वा. ना. देशपांडे यांनी या कालखंडात कथेचे दालन समृद्ध केले. १९१६ ते १९२५ या कालखंडातील ही कथा नव्या जोमाने व नव्या जाणिवा घेऊन अवतरत होती.

'मनोरंजन' कालखंडातील काही महत्त्वाच्या लेखकांनी कथावाङ्मयात मोलाची भर घातली.

## वि. सी. गुर्जर

गुर्जर हे या कालखंडातील महत्त्वाचे लेखक आहेत. गुर्जरांनी १९१० पासून कथालेखनास सुरूवात केल्याचे दिसून येते. त्यांच्या बहुतांश कथा भाषांतरीत आहेत. 'द्राक्षांचा घोस' हा पहिला कथासंग्रह लोकप्रिय ठरला. 'बायकांची जात', 'पुरुषांची जात', 'गीतारहस्य', 'शेवटचे हास्य', 'लाजाळूचे झाड' या कथा विशेष गाजल्या. १९१० पासून १९६४ पर्यंत सातत्याने कथालेखन करून एकूण सहाशेच्यावर कथा लिहिल्या. त्यातून निवडक कथांचा पहिलावहिला कथासंग्रह म्हणजेच 'द्राक्षांचा घोस'.

रंजकता, विनोदी ढंग, उत्कृष्ट संवाद यामुळे त्यांच्या कथा अधिक उंची गाठतात. गुर्जरांच्या कथेत पांढरपेशा वर्गातील समस्या, प्रणय भाव-भावनांचे दर्शन गुर्जरांनी मराठी कथेत प्रथम मांडल्याचे दिसते.

'मनोरंजन' मासिकाचे सहसंपादक असल्यामुळे प्रत्येक अंकात एकतरी कथा असावी असा त्यांचा कटाक्ष असायचा. गुर्जरांच्या कथेबद्दल म. ना. अदवंत म्हणतात, ''मराठी सृष्टीत स्वतंत्र स्थान मिळवून देण्याचे व तिला स्वत:चे खास रूप मिळवून देण्याचे क्षेत्र मुख्यत: गुर्जरांना दिले पाहिजे.''[७] हे त्यांचे मत उचित वाटते.

## कृ. के. गोखले

कृ. के. गोखले यांनी मराठी कथावाङ्मयात घातलेली मोलाची भर त्यांच्या कथालेखनावरून स्पष्ट होते. 'खूप केलीत सुनबाई' व 'इतर गोष्टी' या कथासंग्रहातील कथा खूप गाजल्या. हरिभाऊंच्या परंपरेतील कथा वाचत असल्याचा वाचकांना अंदाज येतो. केवळ मनोरंजनाचा प्रधान हेतू समोर ठेऊन कथालेखन केल्यामुळे त्यांच्या कथेकडे वाचकवर्ग वळू लागला. समाजातील विविध स्तरावरील मानवी स्वभावाचे चित्रण त्यांच्या कथेत आले आहे. राजेरजवाडे, सरदार-करदार व जहागिरदार या उच्चवर्गाचे जीवनही त्यांच्या कथेत आले आहे. इंग्रजीतून भाषांतरीत कथांची भर त्यांनी घातली आहे.

## ना. ह. आपटे

१९१४ पासून ना. ह. आपटे यांनी लेखनास प्रारंभ केल्याचे दिसते. 'बनारसी बोरे' या पहिल्या कथासंग्रहापासून 'पाणी आणि शेवाळ' व 'आराम-विराम' या कथासंग्रहातील कथांतून बोध करणे, व्यावहारिक आदर्श समोर ठेवणे हे उद्देश समोर ठेऊन कथालेखन केल्याचे दिसते. 'बनारसी बोरे' या पहिल्याच कथासंग्रहातील सामाजिक, कौटुंबिक, ऐतिहासिक, रहस्यमय आदी वैशिष्ट्यांनी कथा रंजक बनविल्या आहेत.

## वा. ना. देशपांडे

वा. ना. देशपांडे हे हरिभाऊंच्या परंपरेतील लेखक असले तरी आपल्या स्वत:च्या लेखनशैलीने त्यांची कथा आपले वेगळेपण दाखविते. 'सुखस्वप्ने' व 'दीपावली' हे त्यांचे दोन कथासंग्रह उल्लेखनीय आहेत.

वा. ना. देशपांडे यांनी काल्पनिक ध्येयवादी मानवी स्वभावाचे चित्रण उत्कृष्टपणे केले आहे. त्यांच्या कथेतील विश्व उच्चस्तरातील कौटुंबिक स्थितीचे वर्णन त्यांच्या कथांमधून आले आहे. त्यांच्या कथेतील व्यक्तिचित्रण हे ध्येयनिष्ठ, आदर्शवत व अस मान्य आहे.

## वा. म. जोशी

वा. म. जोशी यांनी हरिभाऊंच्या उत्तरार्धात कथालेखनास सुरूवात केल्याचे दिसते. त्यांचा 'नवपुष्पकरंडक' १९१६ साली प्रसिद्ध झाला. या कथांचा वेगळेपणा अनेक बाबतीत आढळून येतो.

वा. म. जोशी यांची कथा हरिभाऊंच्या कथेतील कौटुंबिक वातावरणातून बाहेर पडलेली दिसते. बुद्धिनिष्ठ व शिक्षित समाज त्यांच्या कथेत आला आहे. 'दोन स्वदेशीचा लढा', 'चारित्र्यक्रांती', 'नाटकराव' व 'नाव बदलीन' यासारख्या कथांतून वेगळेपण

जाणवून दिले आहे. त्यांची कथा मनोरंजनपर, रहस्यमय वाटते. गुंतागुंतीच्या कथानकाला वेगळी कलाटणी देऊन वाचकप्रिय कथा साकारण्यात वा. म. जोशी हे यशस्वी कथाकार ठरले आहेत.

## शि. म. परांजपे

शि. म. परांजपे यांनी उत्कृष्ट कथालेखन केले आहे. '१६२७ पूर्वी पाच वर्षे', 'एका यात्रेकरूचा प्रवास', 'एक कारखाना' या कथांतून राजकीय घडामोडी व संघर्ष आलेला दिसून येतो. शि. म. नी कथालेखनाबरोबर निबंधमालिकेतूनही समाजप्रबोधन केले आहे. त्यांच्या कथांतून देशप्रेम, स्वावलंबन या विषयांना प्राधान्य देत, उपहास व व्यंगचित्राद्वारे प्रचलित सामाजिक स्थितीचे दोषदर्शनही त्यांच्या कथांनी घडविले आहे. 'प्रार्थना', 'मदनदहन', 'नवीसृष्टी' यासारख्या कथांतून उपहास अधिक जाणवतो. एका वेगळ्या धाटणीच्या कथा लिहून कथालेखन उत्कृष्ट झाले आहे.

## न. चिं. केळकर

न. चिं. केळकरांनी 'मौजेचे चार प्रहर' व 'कुशा-निशा व इतर गोष्टी' हे कथासंग्रह प्रसिद्ध केले. नर्मविनोद, खेळकरपणा त्यांच्या कथेत जागोजागी दिसून येतो. 'माझी आगगाडी कशी चुकली', 'म्हणा स्वराज मतदार संघ की जय', 'शेवटचे लढाऊ जहाज' यासारख्या राजकीय कथाही लोकप्रिय ठरल्या.

न. चिं. केळकरांच्या कथेची भाषा सहजसुंदर व विनोदी, खेळकर लेखनशैलीची असल्यामुळे सर्वसामान्य वाचकवर्ग त्यांच्या कथेकडे आकृष्ट झाला.

## श्री. कृ. कोल्हटकर

श्री. कृ. कोल्हटकरांचे 'चारगोष्टी' व 'तीन शिशुकथा' हे कथासंग्रह लेखन प्रसिद्ध आहेत. अगदी वेगळ्या धाटणीच्या कथांमधून श्रद्धा, अद्भूतरम्यता, प्रसंगाची विविधता

ही वैशिष्ट्ये दिसून येतात. 'बबीची तयारी', 'मोत्याचा पापा' व 'आजोबाचे काम' या शिशुकथा वेगळ्या शैलीत साकारल्या आहेत.

या कालखंडातील काही कथालेखकांनी 'मनोरंजन' कालखंड समृद्ध करण्यास हातभार लावला आहे. त्यात आनंदकर्ते वा. गो. आपटे, कृ. ह. जोगळेकर, ह. वा. अत्रे, गो. रा. भाटे यांचा उल्लेख करणे गरजेचे वाटते. नाट्यछटाकार दिवाकर कृष्ण यांनी 'मनोरंजन' कालखंड व त्यापुढील लघुकथेकडे वाटचाल करणारी वेगळ्या वळणाची कथा लिहून या दोन्ही कालखंडाला जोडणारा दुवा निर्माण केला.

## दिवाकर कृष्ण

दिवाकर कृष्ण यांनी १९२२ साली कथालेखनास प्रारंभ केला. 'अंगणातील पोपट' ही त्यांची पहिली कथा 'मनोरंजन' मासिकात मे १९२२ ला प्रसिद्ध झाली. १९२७ ला 'समाधी व इतर गोष्टी' हा कथासंग्रह प्रसिद्ध झाला. 'रूपगर्विता आणि सहा गोष्टी' (१९४१), 'महाराणी व इतर कथा' (१९५१) या कथासंग्रहातून एकवीस कथा प्रसिद्ध केल्या आहेत.

दिवाकर कृष्ण यांनी कथेतील व्यक्तिरेखांच्या मनातील भाव-भावना, आंदोलने अचूक टिपून कथेला कलात्मक उंची देऊन नवकथेचे दालन समृद्ध केले आहे. ''नव्या मराठी लघुकथेचे पहिले यशस्वी प्रवर्तक''[८] असा गौरव वि. स. खांडेकर यांनी दिवाकर कृष्ण यांचा केलेला आहे.

## मनोरंजन कालखंडातील महत्त्वाच्या स्त्री लेखिका

हरिभाऊंच्या काळापासून स्त्रियांची दुःखे मांडण्यास सुरूवात झाली होती. पुरुष लेखक मंडळीनी स्त्रियांची दुःखे, समस्या मांडण्याची अखंड परंपरा पुढेही चालू ठेवली होती.

पुढे स्त्रिया शिकू लागल्या, वाचू लागल्या व आपआपल्या समस्या मांडू लागल्या. हरिभाऊंच्या काळात काशीताई कानिटकर कथालेखन करत होत्या. पुढे 'मनोरंजन' कालखंडात गिरिजाबाई केळकर व आनंदीबाई शिर्के या दोन प्रमुख स्त्री लेखिका कथालेखन करू लागल्या.

## काशीताई कानिटकर

काशीताई कानिटकरांनी 'चांदण्यातील गप्पा' व 'शिळोप्याच्या गप्पा' हे दोन कथासंग्रह प्रसिद्ध केले. नीति, धर्म, त्याग, समर्पण व सत्य तत्त्वावर आधारलेल्या कथांतून सामाजिक आशय असणाऱ्या कथा काशीताइ कानेटकरांनी लिहिल्या. काशीताईंच्या कथांबद्दल इंदुमती शेवडे लिहितात, ''नीती किंवा धर्मतत्त्वाचे प्रतिपादन हा त्यांच्या कथेचा हेतू आहे.''[९] स्त्रीला स्त्रीत्त्वाची जाणीव झाल्याचे त्यांच्या कथा वाचताना प्रत्ययास येते.

## गिरिजाबाई केळकर

गिरिजा केळकरांचे 'समाजचित्रे' व 'केवळ विश्रांतीसाठी' हे दोन कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. सामाजिक व कौटुंबिक ताण-तणाव व स्त्रीजीवनाचे उत्कृष्ठ चित्रण त्यांच्या कथांनी केले आहे. त्यांच्या काही कथांमधून विभक्त कुटुंब पद्धती व पाश्चात्य शिक्षणाचा परिणाम दाखविणाऱ्या कथा आहेत.

## आनंदीबाई शिर्के

मनोरंजन कालखंडातील उत्कृष्ठ कथालेखिका म्हणून आनंदीबाई शिर्के यांचा उल्लेख महत्त्वाचा वाटतो. त्यांच्या 'कथाकुंज', 'कुंजविकास', 'जुईच्या कळ्या', 'मोगरीच्या कळ्या' कथासंग्रहातून स्त्रीजीवनातील विविध समस्या, ताण-तणाव चित्रित झालेले आहेत. त्यांच्या कथेतील स्त्री शिकलेली, स्वत्त्वाची जाणीव झालेली व स्वावलंबन आहे. साध्या सरळ निवेदन पद्धतीने साकारलेल्या त्यांच्या कथा या कालखंडात लोकप्रिय ठरल्या. पुढे आनंदीबाईनी लिहिलेल्या प्रेमकथाही लोकप्रिय झाल्या. ''विषयाला न्याय देणारी

लालित्यपूर्ण भाषा, नर्मशृंगार, योगायोगाचा योग्य तो वापर, सुयोग्य व्यक्तिचित्रे यामुळे आनंदीबाईंच्या प्रेमकथा वाचनीय बनलेल्या आहेत''[१०] असे अंजली सोमण म्हणतात ते यथार्थ वाटते.

## यशंवत – किर्लोस्कर कालखंड

१९२६ ते १९४५ या कालखंडात लघुकथा वेगाने भरभराटीस येऊ लागली. त्यात पूर्वार्धात 'रत्नाकर' मासिकाने सुरूवात करून अनेक नामवंत लेखक मंडळी उदयास आली. उत्तरार्धात 'यशवंत' मासिकाने लघुकथेला वाहून घेतल्याचे दिसते. त्यानंतर 'किर्लोस्कर' मंडळीची 'किर्लोस्कर', 'स्त्री' व 'मनोहर' ही तीन मासिके सातत्याने लेखन पुरवत होती. वि. स. खांडेकर व वा. रा. ढवळे यांचे 'ज्योत्स्ना' व के. नारायण यांचे 'प्रतिभा' मासिक पुढे प्र. श्री. कोल्हटकरांचे 'संजीवनी' ही साहित्यिक मासिके एकामागून प्रसिद्ध होत होती.

या कालखंडातील मासिकांनी लघुकथा विकसित करत नव्या वळणावर नेऊन उभी केली. पूर्वीच्या पसरट कथांपेक्षा या मासिकांतील कथा अचूक संदर्भ टिपत रेखीव बनत चालल्या होत्या. कथानक, घटना-प्रसंगांना गौणस्थान देऊन स्वभावचित्रणाला अधिक महत्त्व देत ही कथा पात्रांच्या मनातील भाव-भावना, आंदोलने, संघर्ष टिपत होत्या. निवेदन पद्धतीतही वैविध्य येऊन कथा कलात्मकदृष्ट्या सकस बनत होत्या. बदलता आशय, तंत्रविचार व नव्या जाणिवा कथालेखकांना येऊ लागला होता.

या कालखंडात ना. सी. फडके, वि. स. खांडेकर, य. गो. जोशी, चिं. वि. जोशी, वामन चोरघडे, अनंत काणेकर इत्यादी लेखकांना हा कालखंड गाजवत कथावाङ्मयात समृद्धी आणली.

## ना. सी. फडके

ना. सी. फडके यांनी १९२६ च्या आसपास 'रत्नाकर' या मासिकातून लेखनास सुरूवात केली. 'बावनकशी' या कथासंग्रहापर्यंत जवळजवळ वीस कथासंग्रह प्रसिद्ध केले.

'गोषा', 'विलक्षण ओवाळणी' या कथातून बोधपनर लेखन केले आहे. 'जगातील पहिलं पाऊल' व 'माणूस जगतो कशासाठी' यासारख्या कथा विशेष गाजल्या.

१९३४ ते १९४६ या काळात फडक्यांच्या कथांना बहर आलेला दिसून येतो. 'कलेकरीता कला' या तंत्राचा वापर करत कथा आकर्षक बनविल्या. कथेची आकर्षक सुरूवात उत्कंठावर्धक माध्यमातून शेवटी कलाटणी देणारी कथा हे त्यांच्या कथेचे विशेष आहेत. त्यामुळेच त्यांची कथा रंजनात्मक झाली आहे.

## वि. स. खांडेकर

वि. स. खांडेकरांनी 'नवयुग'मधून कथा लेखनास सुरूवात केली. १९२७ साली 'वैनतेय' मध्ये 'निकालया' हा पहिला लघुनिबंध प्रसिद्ध झाला. १९२९ साली 'नवमल्लिका' हा पहिला कथासंग्रह प्रसिद्ध झाला. त्याअगोदर 'घर कुणाचे' या कथेपासून त्यांचे लेखन सुरू झाल्याचे दिसते. त्यांच्या कथांमधून तंत्रापेक्षा सामाजिक जीवनाचे प्रत्ययकारी चित्रण आलेले दिसते.

१९२९ ते १९५० या काळात त्यांचे तीस कथासंग्रह प्रसिद्ध झाले. 'वायूलहरी' (१९३६), 'चांदण्यात' (१९३८), 'सायंकाळ' (१९३९), 'अविनाश'(१९४१), 'मंदाकिनी' (१९४२), इत्यादी कथासंग्रहांची भर त्यांनी मराठी कथावाङ्मयात घातली आहे. त्यांची कथा भावनाप्रधान, ह्दयस्प्र्शी व सामाजिक आशयाकडे वळलेली दिसते. खांडेकरांचे कथेचे तंत्र हे 'जीवनासाठी कला' होते. कथानकांची रेखीव बांधणी, रंजनात्मक लेखनशैलीमुळे त्यांच्या कथांनी उदंड प्रसिद्धी मिळवली आहे. 'रूपककथा' हा नवीन प्रकार त्यांनी मराठी कथेत रूढ केला. त्यांच्या काही कथांवर 'जिब्रान'चा प्रभाव असल्याचे जाणवते.

## य. गो. जोशी

य. गो. जोशी यांची पहिली कथा 'एक रूपया दोन आणे' १९२९ ला प्रसिद्ध झाली. त्यांच्या कथेत मध्यमवर्गीय जाणिवा, कौटुंबिक समस्या या विषयावर भर देणाऱ्या कथा त्यांनी लिहिल्या. 'शेवग्याच्या शेंगा', 'कोथंबिरीच्या पेंड्या', 'सुपारी', 'वहिनीच्या बांगड्या' यासारख्या कथासंग्रहातून समाजातील सर्व नातेसंबंधावर त्यांनी प्रकाश टाकला आहे. य. गो. जोशींच्या कथा लेखनावर फडके-खांडेकरांच्या लेखनाचा प्रभाव पडल्याचे कथा वाचताना जाणवते.

## अनंत काणेकर

अनंत काणेकरांनी १९२५ साली लेखनास सुरूवात केली. 'जागत्या छाया', 'मोरपिसे', 'काळी मेहुणी', 'दिव्यावरती अंधेर' व 'उजेडाची झाडे' हे त्यांचे गाजलेले कथासंग्रह होत.

अनंत काणेकरांवर समाजवादाचा प्रभाव जाणवतो. म्हणून त्यांच्या कथेचेही विषय हे कामकरी, मजूर, वेश्या व्यवसाय करणाऱ्या स्त्रिया व त्यांचे जीवन असे आहेत. दलितवर्गातील व उपेक्षित समाजातील तळागाळातील व्यक्तिरेखा व त्यांच्या समस्या त्यांच्या कथेमधून चित्रित होताना दिसतात.

## वि. वि. बोकील

वि. वि. बोकील यांनी १९२९ साली 'यशवंत' मासिकातून लेखनास सुरूवात केली. 'बेबी' या त्यांच्या कथेने वाचकांचे लक्ष वेधून घेतले. पुढे 'वळवाचे पाऊस' 'गारांचा वर्षाव' व 'वाळूचे घड्याळ' हे कथासंग्रह प्रसिद्ध झाले.

समाजातील तळागाळातील व्यक्तिरेखा व त्यांच्या समस्या त्यांच्या अनेक कथेत आल्या आहेत.

## द. र. कवठेकर

कवठेकर यांचे 'तिळाच्या वड्या', 'दगडावरची रेघ', 'ते निदर्य नाहीत', 'कुकंवाचा करंडा', 'धागेदोरे' इत्यादी कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. कारूण्याची झालर असलेल्या कथांतील विषय हे कौटुंबिक पार्श्वभूमीवर आधारलेले आहेत. माणसा-माणसांतील नातेसंबंधावर भाष्य करणारी त्यांची कथा समाजप्रबोधन घडविते.

## चिं. वि. जोशी

चिं. वि. जोशी हे विनोदी कथाकार म्हणून प्रसिद्ध आहेत. 'वायफळाचा मळा', 'एरंडाचे गुऱ्हाळ', 'चिमणराव' यासारख्या कथासंग्रहातून मानवी स्वभावाचे उपहासात्मक वर्णन विनोदी ढंगात मांडून वाचकवर्गास हसवता हसवता अंतर्मुख बनविले आहे. 'वायफळाचा मळ्या'पासून 'पाल्हाळा'पर्यंत त्यांचे सतरा कथासंग्रह प्रसिद्ध झाले. 'चिमणराव', 'गुंड्याभाऊ', 'खाणावळवाल्या आजी' ही त्यांची कथेतील माणसपुत्रे विशेष गाजली. चिं. वि. जोशीचा विनोद प्रसंगनिष्ठ, स्वभावनिष्ठ व वास्तविकता व स्वाभाविकता या वैशिष्ट्यांनी वाचकांना अंतर्मुख करतो. म्हणूनच कथा विनोदी असली तरी केवळ रंजनात्मक हेतू न ठेवता बोध देण्याच्या उद्देशातून त्यांचे कथालेखन उत्कृष्ठ झाले आहे.

## वामन चोरघडे

वामन चोरघडे हे या काळातील चिंतनशील व दर्जेदार कथा लिहिणारे लेखक आहेत. 'सुषमा', 'हवन', 'यौवन', 'प्रस्थान', 'पाथेय' व 'नागवेल' हे त्यांचे प्रसिद्ध कथासंग्रह आहेत.

चोरघड्यांना जीवनाविषयी असणारी आस्था, आपुलकी त्यांच्या कथांतून जागोजागी प्रकट होते. ग्रामीण जीवनाच्या संस्कारातून त्यांनी निरीक्षलेल्या व्यक्तिरेखा त्यांच्या काही कथांमधून डोकावतात. स्त्री मजूर, कामकरी, शेतमजूर यांच्या दुःखाचे, समस्यांचे चित्रण त्यांच्या कथेत आले आहे.

सरळ साधी निवेदन पद्धती, लयबद्ध रचना कौशल्यामुळे त्यांची कथा रेखीव झाली आहे.

## र. वा. दिघे

र. वा. दिघेंनी 'घरकुल' व 'लक्ष्मीपूजन' या कथासंग्रहातून रंजक कथा जन्माला घातल्या. उपहास व उपरोध त्यांच्या कथेत प्रकट होताना दिसतो. कथेची मांडणी आकर्षक करत त्यांची कथा वाचकांच्या मनाचा ठाव घेते. या कालखंडात दिघेंच्या कथा उत्कृष्ट ठरल्या आहेत.

## ग. ल. ठोकळ

ग. ल. ठोकळ यांनी ग्रामीण जीवनातील बहुतांश कथेतून ग्रामीण व्यक्तिरेखा चित्रित करत या व्यक्तिरेखा वेगवेगळ्या लकबी व त्यांच्या स्वभाववैशिष्ट्यांनी वेगळेपण दाखवून देतात. ग. ल. ठोकळ यांच्या कथेवर र. वा. दिघेंचा प्रभाव दिसून येतो. रंजकता, कल्पनारम्यता या तंत्रानी कथा वाचकांना मंत्रमुग्ध करते. त्यांच्या 'कडूसाखर', 'दौलतजादा' व 'गोफणगुंड्या' यासारख्या कथांनी लोकप्रियता मिळविली आहे.

## विभावरी शिरूरकर

या कालखंडातील एक महत्त्वाच्या कथालेखिका म्हणून विभावरी शिरूरकर यांचा उल्लेख करावा लागतो. बदलत्या सामाजिक संदर्भाबरोबर स्त्री व तिचे भावविश्व बदलत होते. स्त्रिया शिकत होत्या, वाचत होत्या, नोकरी करत होत्या, त्यातील प्रौढ मुलींच्या जीवनात येणाऱ्या समस्या, त्यांच्या मनातील भन्नाट वादळे थोपवताना त्यांनी स्त्री जीवनातील असंख्य बारकावे कथेत मांडले आहेत. 'कळ्यांचे नि:श्वास' (१९३३) हा कथासंग्रह प्रचंड गाजला होता. नव्या प्रवाहाबरोबर जरी स्त्री बदलत होती तरीही तिची नाळ अजूनही सांसारिक रीतिरिवाजात घट्ट पाय रोवून उभी होती. त्यातील अत्यंतिक जीवघेणी स्पर्धा स्त्रिया अनुभव होत्या. स्त्रीमनातील या सर्व घडामोडींचे सूक्ष्म व सखोल

मनोव्यापार त्यांनी कथेत आणले. त्यांच्याबद्दल इंदुमती शेवडे म्हणतात, ''विभावरींनी स्त्रीमानातील विचार विकार पिंजून साहित्यात प्रथम प्रांजळपणे मांडले. स्त्रीमनाचा तोवर अज्ञात असलेला प्रांत त्यांनी उघडा केला.''[११] या कालखंडातील स्त्रियांचे मन जुन्या रूढीना चिकटून होते. त्यांची जाणीव करून स्त्रियांच्या मनातील रूखरूख त्यांनी कथालेखनाद्वारे उत्कृष्टपणे मांडली आहे.

## सत्यकथा – अभिरूची कालखंड

इ. स. १९४५ ते इ. स. १९६० या कालखंडात जागतिक घडामोडींनी या कालखंडात आमुलाग्र बदल झालेला दिसून येतो. १९३९ ला सुरू झालेले दुसरे महायुद्ध १९४५ ला संपले. या युद्धाने जगाचा राजकीय पट बदलला. ब्रिटिश साम्राज्यशाहीचा ऱ्हास, दुसऱ्या महायुद्धात अत्याधुनिक अस्त्रामुळे झालेली प्रचंड मानवी हानी, आणि मनुष्याने केलेली वैज्ञानिक प्रगती, भारतीय स्वातंत्र्याची प्राप्ती, भारत-पाकिस्तान फाळणी, हिंदू-मुस्लिम दंगली, औद्योगिक क्रांती, महानगरांचा जन्म, गांधीजींचा झालेला खून, महागाई, बेकारी, यांत्रिकता, दारिद्र्य यासारख्या घटनांनी मानवी जीवन ढवळून निघाले होते. माणुसकीचा ऱ्हास, शिक्षणाचा वाढता प्रसार व क्रांतीची सर्व क्षेत्रे मानवाने पादाक्रांत केल्यामुळे मानवी जीवनातील परिवर्तन स्पष्ट जाणवत होते. साहित्यात समाजाचे प्रतिबिंब वेळोवेळी उमटत राहते. तसे साहित्यातही या घटनांचा परिणाम जाणवत राहिला. त्यामुळे नवकथा जन्म घेऊन पक्व होऊ लागली. ग्रामीण जीवनातील असंख्य जाणिवा घेऊन आलेले ग्रामीण साहित्य, उपेक्षित जाती-जमातीतील लोकांचे जीवन संघर्ष सांगणारे दलित साहित्य हे प्रवाह मराठी कथेत आले.

नवकथेने मराठी कथेचा चेहरामोहरा बदलून टाकला. कथाविश्वात नव्या जाणिवा अवतरू लागल्या. याच कालखंडात 'सत्यकथा' व 'अभिरूची' या मासिकांनी कथाकारांची नवी पिढी निर्माण केली. नव्या अविष्कारात नव्या दमाने कथेचे दालन समृद्ध केले ते याच कालखंडात.

१९४५ ते १९६० या काळात मराठी कथेला नवे वळण लावण्यात, नवा दृष्टिकोन आणण्यात गाडगीळ, गोखले, भावे, माडगूळकर या चौघांचे कर्तृत्व मोलाचे ठरले. पुढे जी. ए. कुलकर्णी यांनीही वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी केली आहे. म्हणून नागनाथ कोतापल्ले जी. एं. च्या कामगिरीबद्दल म्हणतात, ''या काळात जी. ए. कुलकर्णी सारखा एक समर्थ लेखक अवतारला, जी. ए. कुलकर्णी यांनी मोठ्या निष्ठेने आयुष्यभर कथालेखन केले. कथेमध्ये विविध प्रयोग केले. विशेष म्हणजे कथेकडे त्यांनी अतिशय गांभिर्याने पहिले. भारतीय कथन परंपरेतील असंख्य कथाबंधाशी त्यांनी मराठी कथेचे नाते प्रस्थापित केले.''[१२] या कलाखंडातील लेखक पुढीलप्रमाणे –

## गंगाधर गाडगीळ

मराठी कथेला आधुनिकतेकडे नेणारे एक समर्थ लेखक म्हणून गाडगीळांचा उल्लेख महत्त्वाचा वाटतो. 'मानसचित्रे' हा १९४६ साली प्रसिद्ध झालेला त्यांचा पहिला कथासंग्रह होय. मानवी मनाचा वेध घेत, मध्यमवर्गीय जीवनातील कौटुंबिक समस्या, ताणतणाव त्यांच्या कथेत आलेले आहेत. गाडगीळांनी वेगवेगळी लेखनशैली व निवेदनशैली हाताळत वेगळ्याच घाटाची, परंपरेत न बसणारी कथा लिहिली. त्यांची 'किडलेली माणसे' ही कथा जातीय तणावांच्या पार्श्वभूमीवर माणुसकी हरवलेल्या माणसांची प्रवृत्ती दर्शविते. त्यांच्या कथेत आबालवृद्धांच्या मनोवस्थांचे प्रत्ययकारी चित्रण आले आहे. माणसांचा आंतरिक शोध घेणाऱ्या कथांमधून मानवी विकृती, लैंगिकता, स्वार्थ, जीवघेणी स्पर्धा या विषयांवर परखड भाष्य करणारी कथा त्यांनी साकारलेली आहे. तसेच माणसांच्या व्यथित मनाचा शोध व आंतरिक भावभावना टिपण्यात त्यांची कथा यशस्वी ठरली आहे. त्यांच्या कथेबद्दल चंद्रकांत बांदिवडेकर लिहितात, ''गाडगीळांनी कथा सामान्य मध्यमवर्गीय माणसांच्या जीवनाशी कलात्मकतेने संबंद्ध केली. त्यांच्या कथेत आबालवृद्धांच्या मनोवस्थांचा आलेख आढळतो. आणि जीवनाकडे किती विविध दृष्टींनी पाहता येते याची प्रचिती येते.''[१३] बांदिवडेकरांचे हे मत येथे उचित वाटते.

## अरविंद गोखले

गोखले यांनी १९४५ च्या 'सत्यकथे'च्या दिवाळी अंकात 'कोकराची कथा' प्रसिद्ध केली. खऱ्या अर्थाने याच कथेपासून मराठी कथा नव्या दिशेने वाटचाल करू लागली. त्यामुळे या कथेमुळे मराठी नवकथेतील बदलत्या मूल्यांची कल्पना स्पष्ट होऊ लागली. नवकथेच्या दालनात गोखले यांनी नव्या जाणिवा आणि नवी अनुभूती यांना वेगळा साज चढवून स्वतःच्या कथेचे नवे विश्व उभा केले. १९४५ ला 'नजराणा' हा त्यांचा पहिला कथासंग्रह प्रसिद्ध झाला. त्यानंतर 'मंत्रमुग्ध', 'जान्हवी', 'जन्मखुणा' ते 'शकुन्त' असे एकवीस कथासंग्रहाची भर त्यांनी नवकथेत घातली आहे. गोखल्यांच्या कथांचे विषय विविध प्रकारच्या सामाजिक आशयानी ओतप्रोत असत, तर कधी निसर्गातील विविध घटनाही त्यांच्या कथांचे विषय झाले आहेत. मानव, निसर्ग, गुढ वाटणाऱ्या अकल्पित गोष्टींचा उल्लेख त्यांची कथा घडवित होती. कथांच्या विषयांचे वैविध्य टिपून सकस कथा निर्माण करण्याचा त्यांचा हातखंडा होता.

## व्यंकटेश माडगूळकर

माडगूळकरांनी ग्रामीण जीवनाचे उत्कृष्ट चित्रण आपल्या कथेत केले आहे. 'माणदेशी माणसं' (१९४९), 'गावाकडच्या गोष्टी'(१९५१), 'हस्ताचा पाऊस'(१९५३) 'उंबरठा' हे त्यांचे प्रसिद्ध कथासंग्रह आहेत. 'माणदेशी माणसं' या कथासंग्रहातून त्यांनी माणदेश उभा करून तेथील दारिद्र्य, ग्रामीण समस्या, असंख्य अडचणी व ताणतणाव कथेतून चित्रित केले आहेत. त्यांच्या कथेचे विषय हे दलित ते मैलकुलीपर्यंच्या तळागाळातील समाजातील अनेक व्यक्तिरेखा, पात्रे यांच्या प्रतिमा उभा करताना दिसतात. लहानसहान वाक्यात व बोलीतील सरळ साधेपणामुळे कथा जिवंत झाल्या आहेत. ग्रामीण जीवनाचे प्रत्ययकारी दर्शन त्यांच्या कथा करतातच पण कथेसाठी विशिष्ट घटना

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

प्रसंग असावा लागतो त्या कोणत्याही घटना प्रसंगाना मुद्दाम कथेत न आणता अकृत्रिम रचना कौशल्य त्यांची कथा वाचताना दिसून येते.

सामाजिक आशयाच्या सहजसुंदर कथा व ग्रामीण जीवनाचे भेदक चित्रण त्यांची कथा करताना दिसते. म्हणूनच आनंद यादव म्हणतात, "आपणास आलेल्या समाजातील अनुभवाचे, पात्र, प्रसंगाचे अलिप्तपणाने जे काही आकलन झालेले असेत ते विस्तृतपणे मांडायची दृष्टी माडगूळकरांनी कथेला दिली."[१४] सामाजिक संदर्भाकडे कथेला वळवून मानवी मनाच्या अंतर्गात त्यांची कथा डोकावताना दिसते.

## पु. भा. भावे

गाडगीळ, गोखले, माडगूळकरांपेक्षा वयाने मोठे असलेल्या भावेंनी सर्वात आधी लेखनास सुरूवात केली होती. त्यांच्या बहुतांश कथा पूर्वपरंपरेतून आलेल्या दिसतात. 'पहिला पाऊस' (१९४६) हा त्यांचा पहिला कथासंग्रह होय. त्यानंतर 'स्वप्न' (१९४८), 'सतरावे वर्ष'(१९४९), 'ध्यास'(१९५०) व 'आवर्त' (१९७७) ह्यासारख्या कथासंग्रहांनी प्रचंड लोकप्रियता मिळविली. विविध स्तरातील सामाजिक आशय असणारी, त्यांची कथा मानवी मूल्य, मानवी संघर्ष टिपू लागली.

## या कालखंडातील स्त्री लेखिका

या कालखंडातील लेखिकांनी कथावाङ्मयात मोलाची भर टाकत स्त्रीजीवन व स्त्रीमन या विषयाने स्त्रियांचे जीवन चित्रित केले आहे. त्यात प्रामुख्याने वसुंधरा पटवर्धन, इंदिरा संत, सरिता पदकी, स्नेहलता दसनूरकर या प्रमुख स्त्री लेखिकांनी स्त्री जीवनातील असंख्य समस्या व स्त्रीमनाची घालमेल नोंदवत कथा नव्या वळणावर नेऊन ठेवली. या काळातील स्त्री लेखिकांत वसुंधरा पटवर्धन यांना अग्रस्थान दयावे लागेल.

## वसुंधरा पटवर्धन

वसुंधरा पटवर्धन यांच्या 'शोध' या पहिल्या कथासंग्रहापासून 'प्रतिबिंब' या कथासंग्रहापर्यंतचा कथेचा प्रवास हा आत्मप्रत्याने केला आहे. स्त्रिया केंद्रस्थानी असणाऱ्या त्यांच्या कथा विशेष लक्षणीय ठरल्या आहेत. वसुंधरा पटवर्धन यांनी बदलत्या सामाजिक स्थितीचे स्त्रियांचे भावविश्व उलगडून दाखवण्याचा प्रयत्न कथेद्वारे केला आहे. स्त्रीमनातील असंख्य वादळे, आंदोलने व स्त्रीमानाची अस्वस्थता टिपण्यात त्यांची कथा यशस्वी झाली आहे.

## स्नेहलता दसनूरकर

दसनूरकरांनी १९५५ पासून जोमाने कथालेखनास सुरूवात केल्याचे दिसते. त्यांचे 'कळप', 'मायावी', 'अंधारातील व्यथा' (१९६०), 'स्वर्ग तुच्छ भासतो'(१९५९) 'स्वप्न', 'शपथ', 'परतफेड'(१९९८) इत्यादी कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. या कथासंग्रहातून स्त्रीजीवनातील भीषण कारूण्य व नाटय त्यांनी उत्कटपणे मांडले आहे.

साठोत्तरी कथेच्या अग्रभागी लेखन करणाऱ्या दसनूरकरांचे कथासंग्रही संख्येने जास्त व वाचकप्रिय आहेत. त्यांच्या कथेतील विषय वेश्या व्यवसाय करणाऱ्या स्त्रीपासून ते सर्वसामान्य मांगल्य, निती, संस्कारक्षम स्त्रीयांपर्यंत आले आहेत. उत्कृष्ट कथानिर्मिती करण्याचा हातखंडा असणाऱ्या स्नेहलता दसनूरकरांच्या 'शापित' या चित्रपट कथेला १९८४ चा राज्य सरकारचा प्रथम पुरस्कार लाभला आहे. प्रेमाच्या गोड कहाण्या ठराव्यात अशी कथेची मांडणी करताना प्रारंभ खेळकर नंतर गुंतागुंत रचना व शेवटी कलाटणी देऊन कथा आनंदी बनविली आहे.[१५] या तंत्रामुळे ना. सी. फडके यांच्या लेखनाचा प्रभाव त्यांच्या कथांवर असल्याचे जाणवते.

५

## अण्णाभाऊ साठे

अण्णाभाऊंनी १९४९ ला पहिली कथा प्रसिद्ध करून कथालेखनास सुरूवात केली. 'खुळवाडी' (१९५७), 'बरबाद्या कंजारी'(१९६०), 'भानामती'(१९६२), 'फरारी', 'कृष्णाकाठच्या कथा', 'गजाआड' 'गुऱ्हाळ', 'लाखी' 'जिवंत काडतूस' या त्यांच्या कथासंग्रहांनी लोकप्रियता मिळविली. यापूर्वी मराठी कथावाङ्मयात अनोळखी असलेल्या महार-मांग, रामोशी, चोर, दरोडेखोर य खालच्या जाती-जमातीतील व्यक्ती त्यांच्या कथेचे नायक बनले. त्या पात्रांचे स्वभाव, नीतीधर्म, माणुसकी त्यांनी जोरकसपणे मांडली आहे. त्यांच्या बहुतांश कथा ह्या ग्रामीण कथा आहेत. त्यांनी कथेत उभी केलेली माणसे पोटासाठी धडपडणारी दिसतात. अण्णाभाऊंच्या कथेतून दलित जीवन, झोपडपट्टी व तुरूंगातील कैद्यांचे जीवन चित्रित झाले आहे.

दलित जीवनाच्या प्रत्यक्ष अनुभवातून साकारलेल्या त्यांच्या कथा खऱ्या जाणिवा व समस्या कथेत मांडताना दिसतात. आंबेडकर चळवळीशी दलित या नात्याने असलेली जवळकी, मार्क्सवादाचा प्रभाव यातून त्यांची लेखणी वर्म जाणणारी व मोठ्या ताकदीने उभी राहिल्याचे दिसते.

## शंकरराव खरात

अण्णाभाऊंच्या समकालीन शंकरराव खरातांनीही दलित कथा लोकप्रिय केली. १९५९ च्या आसपास कथालेखनास सुरूवात करून त्यांनी 'बलुतेदार'(१९५९), 'तडीपार'(१९६१), 'सांगावा'(१९६२), 'टिटवीचा फेरा'(१९६३), 'सुटका'(१९६४), 'मुलाखत'(१९७८) इत्यादी नऊ कथासंग्रह प्रसिद्ध केले.

त्यांच्या कथांमधून गावकुसाबाहेरचे जीवन चित्रित होताना दिसते. बलुतेदार, भटक्या जाती-जमाती, उपेक्षित दलित समाजातील माणसांच्या जीवनाचे यथार्थ चित्रण त्यांच्या कथेत आले आहे. 'आडगावचं पाणी' ह्या ग्रामीण जीवनावरील कथासंग्रहातून

आलेल्या कथा हलक्या फुलक्या व करमणूक करणाऱ्या आहेत. त्यांच्या कथांमध्ये दलित माणसाला अस्पृश्य म्हणून सोसाव्या लागणाऱ्या मानहानीचे, संघर्षाचे चित्रण आले आहे. ग्रामीण भागातील अंधश्रद्धा, भोळसर रूढी परंपरेचे चित्रणही त्यांच्या कथेत दिसते. त्यांच्या कथेवर आंबेडकरी विचारांचा प्रभाव असल्याचे जाणवते.

## बाबुराव बागूल

बाबुराव बागूल हे साठोत्तरी कालखंडातील महत्त्वाचे कथाकार आहेत. त्यांच्या 'जेव्हा मी जात चोरली होती' (१९६३), 'मरण स्वस्त होत आहे'(१९६९) व 'सूड' (१९७८) ह्या दीर्घकथांनी त्यावेळी समाज ढवळून निघत होता.

समाजातील दांभिकता, नैतिकता त्यांच्या कथेतून आविष्कृत होताना दिसते. 'मरण स्वस्त होत आहे' या कथासंग्रहातून त्यांनी महानगरीय जीवन, झोपडपट्टीत राहणाऱ्या असंख्य माणसांचे जीवन चित्रित करताना त्यांचे दैन्य, दारिद्रय, त्यांच्या वासना, इच्छा-आकांक्षा यावर जोरकस भाष्य केले आहे.

बाबुराव बागूल यांच्या कथेतून शोषणविरहित समाजाचे स्वप्न, वर्ग-वर्ण यातील भेदाचे वास्तव चित्रण त्यांची कथा करते. दलित जीवनाच्या अन्यायाविरूद्ध त्यांची लेखणी आग ओकू लागते. 'विद्रोह' व 'जेव्हा मी जात चोरली होती' या कथासंग्रहातून याची प्रचिती येते. श्रेष्ठ दर्जाच्या कथालेखनाबरोबर त्यांनी मौलिक स्वरूपाची समीक्षाही लिहिली आहे. बागूल हे एक दर्जेदार तत्वचिंतक व विचारवंत आहेत.

## शंकर पाटील

शंकर पाटील हे आघाडीचे ग्रामीण कथाकार होते. माडगूळकरांच्या पाऊलवाटेवरून चालताना त्यांची कथा अस्सल ग्रामीण झाली आहे. पुढे मात्र त्यांनी स्वत:ची अशी वेगळ्या धाटणीची कथा लिहून वेगळी वाट शोधली. त्यांच्या 'वळीव'(१९५८), 'भेटीगाठी'(१९६०), 'आभाळ'(१९६३), 'खुळ्याची चावडी'

(१९६४), इत्यादी कथासंग्रहाना प्रचंड लोकप्रियता लाभली. ग्रामीण माणसांच्या सांसारिक कौटुंबिक पार्श्वभूमीवर व माणसामाणसांतील विसंगतीवर कधी विनोदीशैलीत तर कधी उपरोधाने, मिस्किलपणे भाष्य केले आहे. ग्रामीण स्त्रियांची दु:खे त्यांनी आपल्या कथांतून समर्थपणे उभी केली आहेत. म. द. हातकणंगलेकर म्हणतात, ''ग्रामीण स्त्रियांच्या दु:खाची जाण अधिक सविस्तर, या दु:खाची भाषाही अधिक प्रवाही, परिणामकारक आहे.''[१६] गंभीर कथालेखनाबरोबर विनोदी कथालेखन त्यांनी केले आहे. 'खेळखंडोबा'(१९७४), 'ताजमहलमध्ये सरपंच'(१९७७) हे विनोदी कथासंग्रह तर 'वावटळ, 'हळदीकुंकू', 'फरारी' व 'पिंजरा' या गाजलेल्या चित्रपटांचे पटकथालेखन त्यांनी केले. त्यांच्या कथेत मानवी भावभावना व मानवी मनाचा शोध घेणारी नजर कथा वाचताना दिसते.

## द. मा. मिरासदार

मिरासदारांची 'रानमाणूस' ही पहिली कथा सत्यकथेत आल्यावर त्यांनी 'गप्पागोष्टी', 'गप्पांगण', 'गाणारा मुलूख', 'गुदगुल्या', 'जावाईबापूच्या गोष्टी', 'ताजवा', 'भूताचा जन्म', 'माझ्या बापाची पेंड' व 'मिरासदारी' इत्यादी कथासंग्रह प्रसिद्ध केले.

मिरासदारांनी व्यंकटेश माडगूळकर व शंकर पाटील या कथाकाराहून भिन्न प्रकृतीच्या कथा लिहिल्या आहेत. माणसांच्या वर्तनातील विविध कंगोरे, लकबी, हालचाली यांचे सूक्ष्म निरीक्षणातून कथा सजीव झाल्या आहेत. मानवी मनातील अंतर्विरोध टिपण्यात ते कुशल कथाकार आहेत. त्यांनी एकूण २४ कथासंग्रहांची भर मराठी कथावाङ्मयात घातली आहे.

मराठी नवकथेला नव्या वळणावरून तिला मार्गस्थ करण्याचे काम मिरासदारांनी केले आहे. मिरासदारांच्या विनोदी कथांचा विषयही ग्रामीण व्यक्तिरेखांच्या, पात्रांच्या विक्षिप्त स्वभावाचे, लकबीचे तर काही पात्रांच्या तऱ्हेवाईक बढाईखोर स्वभावाचे वर्णन करताना साधलेल्या विनोदातून कथा निर्माण झाल्या आहेत. त्यांच्या ह्या सर्वसामान्य

असणाऱ्या पात्रांच्या विनोदाबद्दल आनंद यादव म्हणतात, ''घटनांचा कालिकक्रम आणि चढती भाजणी असल्यामुळे कथा विनोदाच्या दृष्टीने रंगत जाते. वाचक मनोरंजनात एक केंद्र होऊन पुढे सरकतो. बाकीच्या इतर अंगाचा विचार करायला त्याला फुरसदच मिळत नाही.''[१७] त्यांच्या कथेमध्ये प्रकटणारी पात्रे व त्यांच्या लकबी यातून अकृत्रिम विनोदाची निर्मिती झाल्याचे कथा वाचताना प्रत्ययास येते.

## रणजित देसाई

रणजित देसाई यांची 'भैरव' ही प्रसाद मधून प्रसिद्ध झालेली पहिली कथा होय. त्यानंतर 'कणव'(१९६०), 'जाण'(१९६२), 'कातळ'(१९६५), 'गंधाली'(१९७१), 'कमोदिनी' (१९७८), 'आलेख'(१९७९), इत्यादी कथासंग्रह प्रसिद्ध आहेत.

सामाजिक आशयावर भर देत त्यांची कथा ग्रामीण जीवनाचे दर्शन घडवित होती. त्यांच्या कथेतील विशेष म्हणजे तिला हळूवारपणा देत, भावनिक, नीतीमत्तेची जाण असलेल्या व्यक्तिरेखा हाताळण्याचा हातखंडा त्यांच्या कथेतून जाणवतो. खेडूतांच्या जीवनातील चांगूलपणा मांडून आकर्षक कथानक रचना, शैली यांचा वापर करत त्यांच्या कथा प्रगल्भतेने साकारल्या आहेत.

इ. स. १९४५ ते १९६० या काळात मराठी कथेला नवे वळण लावण्यात, तिला नव्या जाणिवा प्राप्त करून नव्या दृष्टीकोनातून, तिला परंपरेच्या रूढीतून मुक्त करण्याचे काम गोखले, गाडगीळ, भावे, माडगूळकर यांनी केले. पुढे जी. ए. कुलकर्णी यांची कथा वेगळ्या वैशिष्ट्यांनी बहरत गेली.

या काळात कथेचा विकास होऊन कथेमध्ये आमुलाग्र बदल होत, एक प्रकारची क्रांती झाल्याचे या काळात आढळून येते. या कालखंडातील कथावाङ्मयाबद्दल म. द. हातकणंगलेकर म्हणतात, ''या कथाकारांनी कथा या वाङ्मय प्रकाराला कलात्मक सामर्थ्य व आत्मा प्राप्त करून दिला. त्याप्रमाणे नवीन विषय गंभीरपणे हाताळण्याची

धिटाईदेखील मिळवून दिली.''[१८] या कालखंडातील हा आमुलाग्र बदल चटकन लक्षात येतो.

**नवकथा**

१९६० नंतर खऱ्या अर्थाने मराठी कथेचा विकास झाला. १ मे १९६० ला 'संयुक्त महाराष्ट्राची' स्थापना झाली. विविध सुधारणा, सहकारी चळवळी, लोकशाही शासनप्रणाली आणि समाजातील उपेक्षित जाती-जमातीत, दलितांमध्ये आलेले आत्मभान, १९७२ ला पडलेला दुष्काळ व आणीबाणी या सर्वांचा परिणाम मराठी कथावाङ्मयावर होणे अपरिहार्य होते. त्यामुळेच १९६० नंतर मराठी कथा नव्या जाणिवा, आशय व अभिव्यक्ती प्रकट करत नव्या वळणावरून वेगाने पुढे सरकत होती. प्रत्येक लेखक स्वत:ची अशी खास लेखनशैली व प्रयोगशील लेखन करत कथेला नवी क्रांती देत होते.

या काळात मराठी कथेचा कायाकल्प झाला. कथा रचनेचे विविध प्रकार व प्रयोग याच काळात कथेच्या रचना माध्यमातून दिसून येतात. त्याप्रमाणे जीवनाच्या विविध स्तराचे, अंगाचे चित्रण कथेमधून झाल्याचे दिसते. या काळात कथेतील आशयामधून सखोल जीवनदृष्टी व्यक्त झालेली दिसते. कथेला एखादा विषय अथवा विशिष्ट संदर्भ असावा लागतो. ही समजूत नाहीशी झाली. कथाकार आपली कथा कलावंताच्या निष्ठेने साकारू लागले. मध्यमवर्गीय जीवन, शहरी जीवन आणि याहीपेक्षा वेगळ्या समजल्या जाणाऱ्या खालच्या जातीचे, उपेक्षितांचे व ग्रामीण जीवनातील जाणिवा कथेत व्यक्त होऊ लागल्या.

आधुनिक काळातील प्रगतशील मानवाच्या मनाचा कोंडमाराही कथा चित्रित करू लागली. मानवी जीवनाच्या क्षेत्राबाहेरची प्राणीसृष्टी, निसर्ग हादेखील कथेचा विषय होऊ लागला. मनुष्य आणि शहरी जीवन कथेचे पारंपरिक तंत्र नवकथेने झुगारून टाकले. सरळ, सपाट, एकपदरी, निवेदनाखेरीज विविध स्तरावरून व्यक्त होणारी स्पंदने, विविध छटा

निवेदनात येऊ लागल्या. कथेकडे गांभिर्याने पाहण्याचा दृष्टिकोन याच कालखंडात कथाकारांना लाभला.

## १९६० नंतरचे काही कथाकार

## जी. ए. कुलकर्णी

मराठी नवकथेत अफाट लोकप्रिय असलेला, मराठीतील सर्वश्रेष्ठ कथाकार म्हणून जी. एं. चा उल्लेख महत्त्वाचा वाटतो. जी. एं. नी स्वतःची अशी विशिष्ट लेखनशैली हाताळल्यामुळे त्यांच्या कथेत नव्या जाणिवा, नवा आशय, नवे संदर्भ येताना दिसतात.

'सत्यकथा' मासिकात मार्च १९५५ च्या अंकात 'अंधाराची पावले' ही कथा प्रसिद्ध झाली. त्यानंतर 'पडदा', 'राधी', 'गुंतवळ', 'अवशेष' ह्या कथा प्रकाशित झाल्या अन् वाचकवर्ग अचंबित झाला. आपल्या आगळ्यावेगळ्या निवेदनशैलीमुळे कथा वेगळ्या वैशिष्ट्यांनी समृद्ध झाली. 'निळा सावळा'(१९५९) हा त्यांचा पहिला कथासंग्रह प्रसिद्ध झाला. त्यानंतर त्यांचे 'पारवा' (१९६०) 'पिंगळावेळ'(१९७७) हे विविध प्रकारच्या कथांचे संग्रह प्रसिद्ध झाले. वास्तव चित्रण, शोकात्म भाव व्यक्त झालेल्या कथांची निवेदनशैली, कथा रचना श्रेष्ठ दर्जाची आहे. या कथांमधून दारिद्र्य, वासना व अंधश्रद्धा यातून जीवन जगण्यात निर्माण होणारे पेचप्रसंग त्यांची कथा यथार्थपणे मांडते. यामुळेच मराठी समीक्षाक्षेत्रातही जी. एं. ची कथा बहुचर्चित झाली आहे. म्हणून जी. एं. च्या कथाबद्दल म. द. हातकणंगलेकर म्हणतात, ''जी. एं. च्या कथातील प्रतिमांची जीवसृष्टी ही स्वतंत्र अभ्यासाचा विषय ठरावा इतकी गडद आहे. कथा विषयांचा भेद करून त्याला परत एकजीव करण्याचे सामर्थ्य तिच्यात आहे. काहीवेळा ती पुनरूक्त व एकसुरी भासली तरी तिचे विलक्षण सामर्थ्य नाकारता येत नाही.''[१९] म. द. हातकणंगलेकरांचे हे मत येथे सार्थ वाटते.

## कमल देसाई

जी. ए. कुलकर्णी नंतरचे दुसरे उल्लेखनीय नाव घ्यायचे झाले तर कमल देसाई यांचा उल्लेख करावासा वाटतो. 'रंग' हा त्यांचा पहिला कथासंग्रह प्रसिद्ध आहे. कमल देसाई यांनी स्वत:च्या अनुभवातून आलेले भान त्या कथेत मांडताना दिसतात. 'रंग' या कथासंग्रहानंतर त्यांची दुसरी कथा 'काळा सूर्य' ही होय. त्यांच्या कथेत नोकरी करणाऱ्या तरूणी व त्यांची अंतर्गत घुसमट, मानसिक आंदोलने टिपण्यात त्यांची कथा यशस्वी झाली आहे. स्त्रीजीवनाचे यथार्थ दर्शन त्यांची कथा घडविते. काही कथांमधून मध्यमवर्गीय जाणिवा, स्त्रीमनातील विचलता, विवशता त्या समर्थपणे मांडताना दिसतात.

## दिलीप चित्रे

दिलीप चित्रे यांनी १९६५ च्या आसपास कथालेखनास सुरूवात केली. १९६५ ते १९६८ या तीन वर्षाच्या काळातील कथांचा संग्रह म्हणजे 'ऑर्फियस' (१९६८) होय. एका वेगळ्या आविष्काराने जन्माला आलेली त्यांची कथा अस्तित्ववादाशी निगडीत आहे. 'केसाळ काळंभोर पिल्लू', 'तिडीक-तिरडी आणि अनंतकाळ' व 'टाइपरायटर' यासारख्या कथांमधून मानवी भावभावना, मनाचा अलिप्तपणा व तिचा उपहास त्यांनी अत्यंत जोमाने केला आह. मानवाची बुद्धी-मन याचे सखोल मनोविश्लेषण त्यांची कथा करताना दिसते. मानवाची अस्वस्थता, हतबलता, एकाकीपणा ते नव्या जाणिवेने कथेत मांडताना दिसतात. चित्रे वास्तवापलिकडच्या वास्तवाचे चित्रण कथेत करतात. त्यांच्या कथालेखनाविषयी डॉ. पंडित टापरे लिहितात, ''स्वत:च्या लेखनाविषयी अलिप्तपणे, एका शोधकाच्या भूमिकेने विचार करताना भाषेची जागरूकता, अस्तित्वाचे भान, संस्कारातही वृत्तिसाम्यापेक्षा वृत्तिभेदावर दिलेला भर, सुरिॲलिझमशी जुळता असा लेखन स्वभाव, संवेदना स्वभावातून व्यक्त होणारी नवी दृष्टी ही वैशिष्ट्ये लक्षात येतात.''[२०] त्यांची कथा वास्तवापलिकडे जाऊन वास्तवाचे चित्रण करते. त्यांची कथा बरीच वादातीत झाली आहे.

## चि. त्र्यं. खानोलकर

खानोलकरांचा 'सनई' हा पहिला कथासंग्रह आहे. आपल्या वेगळ्या शैलीत त्यांनी कोकण परिसरातील अनेक व्यक्तिरेखा कथेत आणल्या. लहान मुलांचे भावविश्‍व, अंधश्रद्धा, रूढी यावर भाष्य करणाऱ्या त्यांच्या कथा लोकप्रिय झाल्या. त्यांचे कथावाङ्मय संख्येने अल्प असले तरी वेगळ्या वळणांची कथा म्हणून त्यांचे वाङ्मयीन मूल्य मोठे आहे हे नाकारता येत नाही.

## आनंद यादव

ग्रामीण कथेतील एक प्रमुख व श्रेष्ठ कथाकार म्हणून आनंद यादव यांना ओळखले जाते. 'खळाळ', 'आदिताल', 'डवरणी' इत्यादी कथासंग्रह त्यांनी प्रसिद्ध केले आहेत. ग्रामीण जीवनातील असंख्य व्यक्तिरेखांनी त्यांची कथा समृद्ध झाली आहे.

शहरी जीवनाप्रमाणे ग्रामजीवनातही होणारा मूल्यांचा ऱ्हास, वाढत चाललेला जीवनकलह, अगतिकता, हतबलता, यांचा परामर्श घेतला आहे. ग्रामीण जीवनातील बहुजन समाज व त्यांची दु:खे, रीतीरिवाज, शेत, शेतकरी, निसर्ग या सर्व तपशिलांचा उल्लेख त्यांच्या कथा अत्यंत मनस्वी व तरल भाषेत करतात. ग्रामीण बोलीतून आलेले प्रकटन त्यांची कथा वेगळ्या वैशिष्ट्यांनी साकारते. म्हणूनच आनंद यादव यांच्या कथेबद्दल द. ता. भोसले म्हणतात, ''आनंद यादवांचा मूळ प्रतिभाधर्म सूक्ष्म, तरल, संवेदनशील अशा अनुभूती ताकदीने उभ्या करणे हा आहे. पंचेंद्रियांची तृप्ती करण्याची शक्ती त्यांच्या कथेत असते.''[२१] द. ता.भोसले यांचे मत आनंद यादवांच्या कथांना रास्तच वाटते.

## जयवंत दळवी

मानवी मनाचे सखोल निरीक्षण करणाऱ्या श्रेष्ठ कथा जयवंत दळवी यांनी लिहिल्या आहेत. त्यांचे 'गहिवर', 'एदीन', 'स्त्रीपर्व', 'श्रीकांत' हे कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. या सर्व कथासंग्रहातून त्यांनी मानवी जीवनातील दु:खाचे, घटना प्रसंगाचे यथार्थ चित्रण

16114

केले आहे. मानवी भावभावना, हतबलता, तगमग, विकृती, वेडसरपणा व कारूण्य त्यांची कथा टिपताना दिसते. समाजातील सर्व स्तरावरील व्यक्तिरेखांचे सखोल निरीक्षण करून साकारलेल्या त्यांच्या कथामधून त्यांच्या कथेतील व्यक्तिरेखा उदास, बेचैन वाटतात. त्यांची कथा गंभीर प्रकृतीची वाटते.

## वामन होवाळ

वामन होवाळ हे दलित कथाकार म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांनी कथेला नव्या वळणावर नेऊन तिला मार्गस्थ केले आहे. 'बेनवाड' (१९७३) हा त्यांचा पहिला कथासंग्रह प्रसिद्ध आहे. या कथासंग्रहातून आलेल्या ग्रामीण जाणिवा, समस्या त्यांनी उत्कटशैलीत मांडल्या आहेत. जीवनाच्या असंख्य घडामोडीवर त्यांनी भाष्य करताना दलित व दलितेत्तर या दोन्ही जीवनाचे दर्शन त्यांची कथा यथार्थपणे करते. समाजातील भेदभाव नष्ट व्हावा या व्यापक भूमिकेतून ते कथालेखन करत होते. म्हणून डॉ. प्रकाश कुंभार त्यांच्या कथेबद्दल लिहितात, ''वामन होवाळ आपल्या कथांमधून फक्त दलितांच्या जीवनाचे चित्रण करीत नाहीत तर दलितेत्तरांच्या जीवनाचे चित्रण करतात. प्रामुख्याने ग्रामीण भागातील अंधश्रद्धा, रूढी, परंपरा यांनी ग्रस्त झालेले जीवन चित्रित करतात. वामन होवाळ यांचे वैशिष्ट्य हे की, दलित व दलितेत्तर यांच्या जीवनाचा वेगळा विचार करण्याचा एकांगीपणा ते दाखवत नाहीत. लेखकपणाच्या व्यापक भूमिकेतून त्यांनी कथालेखन केलेले दिसून येते.''[२२] त्यांची कथा मानवी मूल्याबरोबर, जातीभेदाबद्दलही भेदक भाष्य करते.

## योगिराज वाघमारे

योगिराज वाघमारे हे दलित कथेतील नव्या पिढीतील एक यशस्वी कथाकार आहेत. 'उद्रेक' (१९७८), 'बेगड' (१९८१) या कथासंग्रहातून दलित जीवन आले आहे. दलित चळवळ व दलितांची संसारचित्रे, त्यांची जीवनपद्धत यांचा सर्वपट त्यांच्या कथेत आला आहे. त्यांच्या 'मायबाप', 'बंड', 'हवेली', 'पीळ' यासारख्या कथांमधून

सामाजिक, आर्थिक, राजकिय, शैक्षणिक व सांस्कृतिक अशा सर्व अंगानी केलेले प्रकटन उत्कृष्ट झाले आहे.

## उद्धव शेळके

ग्रामीण कथेचे उत्कृष्ट कथालेखन शेळके यांनी केले आहे. वऱ्हाडातील ग्रामजीवन त्यांच्या 'शिळानं आणि आठ कथा' या १९५८ ला प्रसिद्ध झालेल्या कथासंग्रहात आले आहे. दारिद्र्यात गांजलेल्या हतबल, निराश लोकांचे जीवन त्यांनी अत्यंत तळमळीने आपल्या कथेत मांडले आहे. 'वाणगी', 'गरिबाघरची लेक', 'कडुलिंबाची सावली' अशा अनेक कथामधून वैदर्भीय ग्रामजीवन व शहरात राहूनही हलाखीचे जीवन जगणाऱ्या ग्रामीण कष्टकरी लोकांची दु:खे शेळके यांनी आपल्या कथांतून मांडली आहेत. ग्रामीण जीवनाचे सखोल दर्शन त्यांची कथा घडविते.

व्यंकटेश माडगूळकरांनी माणदेशी ग्रामजीवन आपल्या कथेत रेखाटले आहे तसेच शेळके यांनी वैदर्भीय ग्रामजीवन रेखाटले आहे. ग्रामीण जीवनातील असाह्यता, दैवाधीनता यावर भर देत त्यांची कथा मानवी जीवनाचे यथार्थ दर्शन घडविते.

## रा. रं. बोराडे

रा. रं. बोराडे यांनी मराठवाड्यातील ग्रामीण परिसर कथेत आणला आहे. त्यांचे 'पेरणी', 'मळणी', 'नातीगोती' हे कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. मराठवाड्यातील ग्रामीण व्यक्तिरेखा रेखाटताना बोराडे यांनी तेथील ग्रामजीवन, रूढी, परंपरा, दु:ख, दैन्य मांडत अख्खा मराठवाडा कवेत घेतला आहे. 'लगीन', 'मिटिंग', 'ताळमेळ', 'योजना', 'वरात' यासारख्या कथांमधून ग्रामीण जीवनातील व्यक्तिरेखा विनोदी ढंगात साकारलेल्या आहेत. बोराडे यांच्या कथेबद्दल डॉ. भीमराव वाघचौरे म्हणतात, ''बोराडे यांची कथा ग्रामसंस्कृतीचे जाणीवपूर्वक वेध घेताना दिसते. असे वेध घेताना त्यांची कथा वास्तवावर

अधिक स्थिरावते. अशा वास्तवाचा वेध घेताना तेथील मानवी मन आणि त्या मनातील विविध स्तरांवरील भावांदोलने ती टिपते.''[२३] वाघचौरेंचे हे विधान समर्पक वाटते.

## महादेव मोरे

प्रादेशिक कथाकार म्हणून महादेव मोरे यांची कथा उल्लेखनीय आहे. निपाणी भागातील विविध स्तरावरील व्यक्तिरेखा त्यांच्या कथेचे विषय झाल्या आहेत. तंबाखू, बिडी कामगारांचे जीवन त्यांच्या कथेचे विषय झाले आहेत. 'दवणा' या कथासंग्रहातून चित्रित झालेले प्रादेशिक जीवन, 'झुंज', 'इंगित' यासारख्या कथांमधून आलेले ग्रामीण जीवन वास्तव ते भेदकपणे मांडताना दिसतात. त्यांच्या कथेत येणाऱ्या व्यक्तिरेखा सर्वस्तरीय पात्रांच्या असणाऱ्या कणखरवृत्ती, रगेलपणा, पात्रांच्याच तोंडी येणारे तडफदार संवादामुळे कथा तडफदार वाटते. मोरे यांच्या कथेबद्दल चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात, ''शोषितांच्या जीवनातले कढ आणि ओढ त्यांच्याच भाषेतून मोरे समर्थपणे रंगवितात. एकूण लेखनात नाजुकपणा, मृदुता, कोमलता कमी, कणखरपणा व रगेलपणा जास्त मराठी कथेला त्यांनी वास्तवाची वेगळी वळणे दाखविली आहेत.''[२४]

चंद्रकांत बांदिवडेकरांचे हे मत महादेव मोरे यांच्या कथेतील पात्रांचा परिचय व त्यांच्या तोंडी येणाऱ्या संवादामुळे व पात्रांनी दाखविलेल्या तडफदारपणामुळे हे मत उचित वाटते.

## अर्जुन डांगळे

दलितांचे आत्मभान समर्थपणे मांडणारे एक समर्थ दलित कथाकार म्हणून डांगळेंचा उल्लेख महत्त्वाचा वाटतो. दलितांच्या जीवनानुभवातून विविध कंगोरे उलगडून दाखविणारी कथा त्यांनी लिहिली आहे. त्यांचे 'उद्‌ध्वस्त क्षितिजे' आणि 'बांधावरची माणसे' या कथासंग्रहातून ग्रामीण, शहरी मानवी जीवनाचे चित्रण त्यांच्या कथेत आले आहे. 'एरिअल आणि पोरकं पाखरू' (१९७६) या संग्रहातून मानवी अस्तित्व विषयक प्रश्नांना

व्यापक अर्थाने कथेतून सामाजिक संदर्भातून पाहिले आहे. डांगळे यांची कथानिवेदनाची पद्धत वास्तव, अतिवास्तव, प्रतिकारात्मक, कल्पनाविश्वात्मक अशी आहे.

पुढे विलास सारंग (सोलेदाद, १९७५), श्याम मनोहर (आणि बाकी सगळे, १९८०), व 'बिनमौजेच्या गोष्टी' (१९८०) हे संग्रह प्रसिद्ध आहेत. भारत सासणे यांचा 'जॉन आणि अंजिरी पक्षी' (१९७८) या कालखंडात गौरी देशपांडे, सानिया, आशा बगे, प्रिया तेंडुलकर इत्यादी कथालेखिकांनी उल्लेखनीय कथालेखन केले आहे.

ह. मो. मराठे, अरूण साधू, केशव मेश्राम, अनिल रघुनाथ कुलकर्णी, रंगनाथ पठारे या १९६० नंतरच्या कथालेखकांनी महत्त्वपूर्ण कामगिरी केली आहे.

## चंद्रकुमार नलगे

चंद्रकुमार नलगे यानी १९६१ च्या दरम्यान कथालेखनास प्रारंभ केला. वारणेच्या खोऱ्यातील परिसर त्यांच्या संपूर्ण कथेत व्यापला आहे. नलगेंचा बहुतांश कालखंड खेडेगावात गेल्यामुळे ग्रामजीवनातील सुखदु:खाची जाणीव त्यांना तेव्हापासूनच होती. त्यांनी पाहिलेल्या, निरीक्षलेल्या व्यक्तिरेखा त्यांच्या कथेत आल्या आहेत. ग्रामीण जीवनातील असंख्य अडचणी, रूढी, परंपरा, श्रद्धा त्यांच्या कथेत जागोजागी दिसून येतात. कथेला बोलीभाषेतून, आख्यायिकेतून, म्हणींचा वापर करून कथेला उंची दिली आहेत. 'अंगाई' ही त्यांची लोकप्रिय कथा प्रचंड गाजली. नलगे यांनी ग्रामीण कथेतून कौटुंबिक भावजीवन रेखाटताना त्यांची कथा भावनाप्रधान वाटते. मंगल्य, नीती, जीवनमूल्यावरची श्रद्धा त्यांच्या कथा प्रकट करतात. त्यांच्या कथेबद्दल डॉ. वासुदेव मुलाटे म्हणतात, ''योगायोगाचा वापर आणि कृत्रिमपणे केलेला कथेचा शेवट यामुळे कथा वास्तवापासून दूर जाते. म्हणून या कथेचे नाते र. वा. दिघे किंवा ग. ल. ठोकळ यांच्या कथेशी जुळते.''[२५] असे असले तरी त्यांची कथा आजही ग्रामीण जीवनाचे वास्तव धुंडाळताना दिसते.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

## राजन गवस

राजन गवस १९८४ च्या आसपास साप्ताहिक सकाळ मधून कथा लेखन करत होते. त्यातूनच त्यांच्या संकलित झालेल्या कथांचे संग्रह 'रिवणावायीली मुंगी' व 'काचा कवड्या' हे दोन कथासंग्रह प्रसिद्ध झाले. ग्रामीण महिला, मजूर, शेतमजूर यांच्या समस्या, भावबंध, सामाजिक आशय, मानवी मनातील आंदोलने अचूक टिपून कथा सकस बनविल्या आहेत. बेकारी, लोकसंख्या, गरीबी यावर भाष्य करणाऱ्या दर्जेदार कथा त्यांनी साकारलेल्या आहेत. ग्रामीण जीवनातील असंख्य व्यक्तिरेखा त्यांच्या लकबी, सवयी, ग्रामीण जीवनातील समस्या त्यांच्या कथांनी उत्कटपणे मांडल्या आहेत. 'चौंडकं', 'भंडारभोग' आदी कादंबऱ्या देवदासी प्रश्नावर गंभीर भाष्य करणाऱ्या ठरल्या आहेत. ग्रामीण परिवेशातील व्यक्तिरेखांची हतबलता, अगतिक व अर्थशून्यता हा त्यांच्या कथेचा प्रमुख विशेष आहे. कथा-कादंबऱ्यातून सामाजिक प्रश्नांची जाणीव त्यांनी करून दिली आहे.

## अप्पासाहेब खोत

ग्रामीण कथाकार म्हणून अलिकडेच त्यांनी नावलौकिक मिळविला आहे. त्यांच्या 'गवनेर' व 'महापूर' या कथासंग्रहांनी लोकप्रियता मिळविली आहे.

पन्हाळा तालुक्यातील ग्रामीण जीवन, अनेक व्यक्तीरेखा, निसर्ग त्यांच्या कथेत आला आहे. समाजातील संस्कृती, विशिष्ट सांस्कृतिक जीवन, मानवी जीवन जगण्याच्या पद्धती, अनुभूती त्यांच्या सर्व तपशिलाने कथा साकारताना दिसते.

मानवी जीवनातील जीवनाचा प्रत्यक्ष अनुभव असलेल्या अप्पासाहेब खोत यांनी आपल्या निरीक्षणातून कथेतून आलेले अनुभवविश्व साक्षात उभे केले आहे. ग्रामजीवनातील अनेक व्यक्तिरेखांबरोबर निसर्गाचेही यथार्थ चित्रण त्यांची कथा करताना दिसते.

१९८० च्या आसपास पश्चिम महाराष्ट्रातील काही लेखक कथालेखन करत होते. या लेखकांमध्ये रंगराव बापू पाटील, नीलम माणगावे, पी. जी. कुलकर्णी यांचा समावेश आहे. त्यांनी आपआपल्या परिसरातील जीवनानुभव कथेत मांडण्यास सुरूवात केली होती. यामध्ये श्याम कुरळे यांनी १९८० च्या आसपास कथालेखनास प्रारंभ केला. त्यांच्या कथावाङ्मयानेही महत्त्वाचा वाटा उचलला आहे. विद्यार्थीदशेत असतानाच लेखनाची आवड जोपासत त्यांनी विपूल प्रमाणात बालवाङ्मयात मोलाची भर घातली आहे. विविध नियतकालिकातून, दैनिकातून, दिवाळी अंकातून कुरळे कथालेखन करत होते. या संकलित कथांचे संग्रह म्हणजे 'फिरकी', 'इस्कुट', 'पायाचा पाषाण', 'इरसाल', 'पार्टी', 'अपूर्ण कथेचा शेवट' व 'लास्ट आयटेम' हे सात कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. या सर्व सातही कथासंग्रहांना वाचकांचा उदंड प्रतिसाद लाभला. शंकर पाटील, द. मा. मिरासदार, महादेव मोरे, चंद्रकुमार नलगे यांच्या पाऊलवाटेवरून जाण्याचा प्रयत्न त्यांनी कथालेखनाद्वारे केला आहे.

ग्रामीण व नागर दोन्ही पार्श्वभूमीवरील मानवी जीवनातील वास्तव, त्यांची अस्वस्थता न्याहळत त्यांची कथा सामाजिक बदल स्वीकारत बहरलेली दिसते. आज खेडी बदलत चालेली आहेत. शासन विविध योजना राबवताना त्यामध्येही फोफावणारा भ्रष्टाचार, अनाचार यावरही त्यांची कथा परखड टीका करताना दिसते. नागर जीवनातील वाढती लोकसंख्या यामधूनच उद्‌भवलेल्या गुंतागुंतीच्या समस्या , बेकारी, सुशिक्षित बेकार यांच्या मनातील वाढता उद्रेक यांचाही उल्लेख त्यांची कथा करताना दिसते.

म्हणूनच १९ व्या शतकापासून चालत आलेल्या कथेच्या परंपरेत श्याम कुरळे यांची कथा भर घालताना दिसते.

## संदर्भ ग्रंथ सूची


| | |
|---|---|
| १. फडके, ना. सी. | : लघुकथा, तंत्र आणि मंत्र, व्हीनस प्रकाशन, पुणे-४, प्रथमावृत्ती, १९५२, पृ क्र. २७ |
| २. जोशी, प्र. न. | : 'आदर्श मराठी शब्दकोश', विदर्भ मराठवाडा बुक कंपनी, पुणे, द्वितीय आवृत्ती, १९८२, पृ. क्र. १२६ |
| ३. कुलकर्णी, दा. वि. | : 'मराठी कथा : स्वरूप आणि आस्वाद', स्वाध्याय महाविद्यालय प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९७६, पृ. क्र. ५९ |
| ४. कुलकर्णी, दा. वि. | : उनि, पृ. क्र. ५४ |
| ५. गुप्त, शांतीस्वरूप | : 'साहित्यिक निबंध', अशोक प्रकाशन, दिल्ली, १९९०, पृ. क्र. ३२० |
| ६. शेवडे, इंदुमती | : 'मराठी कथा : उगम आणि विकास', सोमैया पब्लिकेशन्स प्रा. लि., मुंबई-दिल्ली, १९७३, पृ. क्र. १५६ |
| ७. अदवंत, म. ना. | : 'मराठी वाङ्‌मयाचा इतिहास', खंड पाचवा, भाग पहिला, १९७३, संपादक प्रा. रा. श्री. जोग, पृ. क्र. ३७३ |
| ८. खांडेकर, वि. स. | : 'पाच कथाकार', कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे ३०, सहावी आवृत्ती, १९८६, प्रस्तावना, पृ. क्र. २० |
| ९. शेवडे, इंदुमती | : 'मराठी कथा : उगम आणि विकास', सोमैया पब्लिकेशन्स प्रा. लि., मुंबई-दिल्ली, १९७३, पृ. क्र.२१० |
| १०. सोमण, अंजली | : 'साहित्य आणि सामाजिक संदर्भ' प्रतिमा प्रकाशन, पुणे ३०, प्रथमावृत्ती २००५, पृ. क्र. ५१ |
| ११. शेवडे, इंदुमती | : 'मराठी कथा : उगम आणि विकास', सोमैया पब्लिकेशन्स प्रा. लि., मुंबई-दिल्ली, १९७३, पृ. क्र.२९१ |

१२. कोतापल्ले, नागनाथ : 'साहित्याचा अन्वयार्थ', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, १९९६, पृ. क्र. १६५

१३. बांदिवडेकर, चंद्रकांत : 'मराठी साहित्य : प्रेरणा व स्वरूप', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती, १९८६/१९०७

१४. यादव, आनंद : 'ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि समस्या', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, द्वितीय आवृत्ती, १९८४, पृ. क्र. १९

१५. खांडगे, मंदा (संपा.) : 'स्त्री साहित्याचा मागोवा', खंड-३, भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालय आणि साहित्यप्रेमी भगिनि मंडळ, पुणे, पृ. क्र. ४४

१६. हातकणंगलेकर, म. द. : 'मराठी कथा, रूप आणि परिसर', सुपर्ण प्रकाशन, पुणे, १९८६, पृ. क्र. ९८

१७. यादव, आनंद : 'ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि समस्या', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, तृतीय आवृत्ती, जुलै १९९३, पृ. क्र. ४९

१८.हातकणंगलेकर, म. द. : 'मराठी कथा, रूप आणि परिसर', सुपर्ण प्रकाशन, पुणे, १९८६, पृ. क्र. ३२, ३३

१९. तत्रैव : पृ. क्र. ९६

२०. टापरे, पंडित : 'कथा : रूप आणि आस्वाद', नीहारा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९९९, पृ. क्र. ५१

२१. भोसले, द. ता. : 'ग्रामीण साहित्य: एक चिंतन', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे ३०, १९८८, पृ. क्र. ३६

२२. कुंभार, प्रकाश : 'दलित कथा साहित्य', प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, १९९१, पृ. क्र. २०५

२३. वाघचौरे, भीमराव : 'रा. रं. बोराडे यांचे साहित्य : स्वरूप आणि आस्वाद', विहित प्रकाशन, औरंगाबदार, प्रथमावृत्ती, १९९९, पृ. क्र. ५०

२४. बांदिवडेकर, चंद्रकांत : 'मराठी साहित्य : प्रेरणा व स्वरूप', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती, १९८६/१९०७, पृ. क्र. १५१

२५. मुलाटे, वासुदेव : 'ग्रामीण कथा : स्वरूप आणि विकास', साहित्य प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, पृ. क्र. १५४